# Status of Women at 75th Anniversary of Indian INDEPENDENCE



Dr. Rajani Shikhare
Dr. Pravin Sonune
Dr. Hanmant Helambe
Dr. Santosh Nagre

# Status of Women at 75th Anniversary of Indian Independence

**Dr. Rajani Shikhare**

**Dr. Pravin Sonune**

**Dr. Hanmant Helambe**

**Dr. Santosh Nagre**

walnutpublication.com

INDIA • UK • USA

**Copyright © Dr. Rajani Shikhare, Dr. Pravin Sonune, Dr. Hanmant Helambe & Dr. Santosh Nagre, 2021**

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system, or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, recording or otherwise, without the prior written permission of the authors.

This book has been published with all reasonable efforts taken to make the material error-free after the consent of the authors. The authors of chapters are solely responsible and liable for its content including but not limited to the views, representations, descriptions, statements, information, opinions and references ["Content"]. The publisher does not endorse or approve the Content of this book or guarantee the reliability, accuracy or completeness of the Content published herein. The publisher and the authors make no representations or warranties of any kind with respect to this book or its contents. The authors and the publisher disclaim all such representations and warranties, including for example warranties of merchantability and educational or medical advice for a particular purpose. In addition, the authors and the publisher do not represent or warrant that the information accessible via this book is accurate, complete or current.

eBook ISBN: 978-93-5574-033-5

First Published in December 2021

Published by Walnut Publication (an imprint of Vyusta Ventures LLP)
www.walnutpublication.com

**USA**

6834 Cantrell Road #2096, Little Rock, AR 72207, USA

**India**

#625, Esplanade One, Rasulgarh, Bhubaneswar – 751010, India

#55 S/F, Panchkuian Marg, Connaught Place, New Delhi - 110001, India

**UK**

International House, 12 Constance Street, London E16 2DQ, United Kingdom

# भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षे आणि महाराष्ट्रातील महिला धोरणांचा आढावा

**हणमंत बा. हेळंबे**
सहाय्यक प्राध्यापक व लोकप्रशासन विभाग प्रमुख,
र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई जि. बीड
helambe.hanmant@gmail.com

प्राचीन काळापासून महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आले आहे. आधुनिक काळात अनेक समाजसुधारकांनी महिलाच्या समस्या सोडवण्यासाठी कार्य केले आहे. जसे, राजराममोहन रॉय, महात्मा फुले, महर्षी कर्वे, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मदर तेरेसा, इ. स्वातंत्र्यानंतर हि महिला वर्गात मोठ्या प्रमाणात विकास कार्यात सहभाग तसेच त्यांच्या हक्काप्रती जागरूकता पाहिजेत्या प्रमाणात नव्हती. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत महिलांबाबत होणारा भेदभाव दूर करण्यासाठी 1979 मध्ये ठराव झाला होता. त्यानंतर संपूर्ण जगभरात स्त्रियांच्या मानवी हक्कांविषयी नव्याने चर्चा सुरू होऊन त्यादृष्टीने वाटचाल करण्यासाठी राजकीय धोरणे आखली गेली. महाराष्ट्रात महिला चळवळीचे कार्य तळागाळातल्या महिलांपर्यंत पोहोचलेले असल्याने इथे ती सामाजिक, राजकीय पार्श्वभूमी तयार झाली होती. तसेच 1993 मध्ये पहिल्यांदाच राज्यात महिला आणि बालविकास हे स्वतंत्र खाते सुरू झाले. राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना झाल्यानंतर राज्य महिला आयोग तयार करणारे महाराष्ट्र पहिले राज्य होते. महिलांचे हक्क अबाधित राखून त्यांचे संवर्धन करण्यासाठी राज्याने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल होते असे म्हणता येईल.

संयुक्त राष्ट्रसंघाने 1975 हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले होते. तसेच महिलांची प्रगती घडऊन आणण्यासाठी एक दस्तावेज (Convention on the Elimination of All Forms of Discrimination Against Women) तयार केला होता. तसेच भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत हक्क आणि अधिकार महिलांच्या विकासाचा पाया आहे. परंतु महिला केवळ कल्याणकारी उपक्रमाच्या लाभार्थी राहिल्या त्या विकास प्रक्रियेचा अविभाज्य घटक होऊ शकल्या नाहीत. स्वातंत्र्य चळवळ, कामगार चळवळ, समाजसुधारणा या कार्यात महिलेचा सहभाग होता परंतु स्वातंत्र्योत्तर काळात महिलेचा राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रशासकीय कार्यात/जीवनात तितका सहभाग नव्हता. महिला अनेक समस्याना सामोरे जात होत्या तसेच त्यांच्या मानवी हक्काची पायमल्ली होत होती. उधारीकरणाच्या धोरणानंतर हि या स्थितीत काही परिवर्तन झाले नाही. विकासाची फळे महिलांना न मिळत असमतोल अधिक वाढू लागला. महिला सन्मानाने जगल्या पाहिजेत, त्याना सर्व क्षेत्रात समान संधी व समान स्थान मिळाले पाहिजेत हा दृष्टिकोन समोर ठेऊन महिलांसाठीच्या कायदेशीर तरतुदी आणि कार्यक्रमाची अमलबजावणी करणे केंद्र व राज्याची जबाबदारी आहे.

1994 मध्ये देशात महिला धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. पहिल्या महिला धोरणात कल्याणकारी दृष्टिकोन होता. या धोरणाच्या आखणीत महाराष्ट्रातील महिला संघटनांचा मोलाचा सहभाग होता. महिलांच्या जगण्याचा दर्जा सुधारणे, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय असमानता दूर करणे आणि समाजाचा उत्पादक घटक म्हणून महिलांचा विकास करणे, ही उद्दिष्टे समोर ठेवून हे धोरण आखले होते. 'राज्यातल्या 3.8 कोटी महिलांना आवाज देणारे धोरण' असे वर्णन तेव्हा 'इंडिया टुडे'ने केले. या 40 पानी धोरणात राज्याच्याच नव्हे, तर देशातील अनेक महिलापूरक धोरणांची बीजे होती[1].

दुसरे महिला धोरण 2001 मध्ये विकसनशील दृष्टिकोन घेऊन जाहीर झाले. हिंसाचाराचा प्रश्न ऐरणीवर आला असता तिसरे महिला धोरण. 8 मार्च 2013 रोजी महिला बालविकास मंत्र्यांनी या धोरणातील शिफारशी मांडून या संदर्भातील सूचना करण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी दिला. त्यानंतर या महिला धोरणाला 5 फेब्रुवारी 2014 रोजी मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दिला आहे. महिलाविषयक प्रश्नासाठी लागणारा 10 टक्के निधी राज्य सरकार व 90 टक्के निधी केंद्र सरकार खर्च करणार असे निश्चित करण्यात आले. या धोरणानुसार महिलांना सर्व कायदेशीर बाबींत विशेषत: मालमत्ता वाटपासंबंधी कायदेशीर समान हक्क मिळणार आहेत. बचत गटातील महिलांना आर्थिक साह्य देऊन उद्योगांना उत्तेजन दिले जाणार आहे. कैद्याच्या पत्नीला व्यवसाय मार्गदर्शन दिले जाईल तसेच कैद्याच्या आई-वडिलांना उदरनिर्वाह भत्ता दिला जाईल. शेतकरी महिलांना सवलतीच्या दरात शेतीची अवजारे उपलब्ध करून दिली जातील. ठिबक सिंचन पद्धतीचा शेतीत अवलंब केला तर 100 टक्के सवलत मिळेल. मुले व महिलांना आपल्या आवडीचे नाव, आडनाव लावण्याचा अधिकार असेल. हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलेला खास समुपदेशन दिले जाईल. समलिंगी संबंधाबाबत समाजवर्तणुकीत बदल होण्यासाठी प्रयत्न केले जातील[2]. महिलांना या धोरणामुळे आपले नेतृत्व सिद्ध करण्याची, निर्णय घेण्याचे संधी मिळेल. तसे महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने मदत होईल. प्रत्येक क्षेत्रात महिलांना पुरुषाबरोबर संधी देऊन त्यांना सामोरे जावे लागणाऱ्या समस्या तात्काळ निकाली काढणे आवश्यक आहे. तसेच महिला सक्षमीकरणाच्या योजना प्रभावी राबवून समानता निर्माण करणे गरजेचे आहे.

महिलांसाठीचे कायदे, धोरणातील तरतुदी कागदावरच प्रभावी दिसतात. त्यांच्या अंमलबजावणी सक्षमपणे होताना दिसून येत नाही. महिलाविषयक गुन्ह्यांत वाढ होऊन संबंधित गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. पारंपरिक हिंसेबरोबर ऑनलाइन छळ, सोशल मीडियायामाध्यमातून हिंसेचे नवे आयाम समोर येत आहेत. कमावत्या महिलांचा कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळही वाढला आहे. यासाठी महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या २०१४ मधील महिला धोरणाची प्रभावीपणे अमलबजावणी करणे गरजेचे आहे. बदलत्या काळानुसार आणि सामाजिक परिस्थितीनुसार महिलासमोरील आव्हाने महिलासमोरील आव्हाने वाढत आहेत. हिंसाचाराच्या घटना वाढत आहेत.

यासाठी कठोर कायद्या बरोबर समाजामध्ये महिलांबद्दल आदराची भावना निर्माण करणे व मानसिकतेत बदल घडवून आणणे आवश्यक आहे.  तरच त्या धोरणाचे उद्दिष्ट साद्य होतील.

**संदर्भसूची:**


1. https://maharashtratimes.com/editorial/article/twenty-five-years-of-womenpolicy/articleshow/69893475.cms 22 june2019.
2. Vrushali Magdum, https://divyamarathi.bhaskar.com/news/
3. https://womenchild.maharashtra.gov.in/
4. https://www.maharashtra.gov.in/site/upload/WhatsNew/Mahila%20Dhoran%20Final%20Draft%20.pdf